(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – III ISSN 2277-8063

# भारतातील प्राचीन समाज व्यवस्था

**प्रा. विनायकराव गोरखनाथ जाधव** शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालय, कराड जि. सातारा

९८८१४४०१११

---

**प्रस्तावना :-**

भारतातील प्राचीन समाज व्यवस्था जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेवर आधारित होती, ज्यामध्ये समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्गांमध्ये विभागलेला होता. या व्यवस्थेमध्ये व्यवसाय आणि सामाजिक भूमिकेनुसार लोकांचे विभाजन केले गेले. याव्यतिरिक्त, आश्रम व्यवस्था, पंचऋण आणि चार पुरुषार्थ यांसारख्या सामाजिक आणि नैतिक संकल्पना देखील महत्त्वाच्या होत्या, ज्या व्यक्तीच्या जीवनाला आणि विकासाला दिशा देत होत्या

प्राचीन भारतात व्यक्ती व समाजाच्या प्रगतीला सहाय्य करणाऱ्या आश्रम व्यवस्था-पंचऋण संकल्पना- चार पुरुषार्थ सामाजिक संस्थांची निर्मिती झाली. प्राचीन भारतीय विचारवंतांनी सामाजिक जीवनात मोक्ष प्राप्ती मिळविणे हे मानवाचे अंतिम ध्येय मानलेले होते त्यासाठीच विविध आदर्श संकल्पना समाजासमोर मांडण्यात आल्या त्यापैकीच पंच ऋण संकल्पना ही महत्त्वाची मानलेली होती. त्यातील आश्रम व्यवस्था ही एक प्रमुख सामाजिक संस्था होती.व्यक्ती विकासाबरोबरच समाजाचाही विकास घडवण्याच्या उद्देशाने प्राचीन भारतात सामाजिक जीवनात आश्रम संस्थेला महत्त्वपूर्ण स्थान होते. प्राचीन भारतीयांनी समाज जीवनाची उद्दिष्टे व ध्येय स्पष्ट करताना पुरुषार्थ संकल्पनेला प्राधान्य दिले होते अध्यात्मिकता हा भारतीय संस्कृतीचा पाया असला तरी विचारवंतांनी लौकिक जीवनाचाही विशेष दृष्टीने विचार केला होता.

**१. भारतातील प्राचीन आश्रम व्यवस्था :-**

आश्रम म्हणजे काय? आश्रम म्हणजे श्रम करण्याची जागा; समाजाच्या दृष्टीने व्यक्तीने कोणत्या वयामध्ये कोणते गुणसंपादन करावेत कोणते कार्य करावे, कोणती कर्तव्य पार पाडावीत, याविषयीचे नियम आश्रम संस्थेत सांगितले होते

**आश्रम ( संस्कृत : आश्रम )**ही प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील हिंदू ग्रंथांमध्ये चर्चा केलेल्याजीवनाच्या टप्प्यांची एक प्रणाली आहे

**प्राचीन आश्रम व्यवस्थेत एकूण चार आश्रम आहेत:**

१. ब्रह्मचर्य (विद्यार्थी),
२. गृहस्थ (गृहस्थ),
३. वानप्रस्थ (वनात फिरणारा/वनवासी),
४. संन्यास (संन्यास).

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये व्यक्ती व समाजाच्या प्रगतीला सहाय्य करणाऱ्या ज्या सामाजिक संस्थांची निर्मिती झाली.त्यातील आश्रम व्यवस्था ही एक प्रमुख सामाजिक संस्था होती. व्यक्तीच्या लौकिक व पारलौकिक जीवनातील सुखदुःखाचा विचार करण्याबरोबरच व्यक्ती व समाजाच्या विकासाचाही विचार आश्रम व्यवस्थेत प्राधान्याने केला होता. व्यक्तीने विविध गुणसंपादन करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घ्यावा व याचा समाजाच्या विकासासाठी उपयोग करावा ही ह्या संस्थांच्या निर्मिती मागील प्रमुख भूमिका होती. आश्रम संस्थेने नैतिक स्वरूपातील नियम मांडले होते. व्यक्तीने व समाजाने या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे अशी अपेक्षा होती. मात्र या नियमांचे पालन न करणाऱ्या व्यक्तीला शिक्षक देण्याची यंत्रणा अस्तित्वात नव्हती. आश्रम संस्थेच्या नियमाचे समाजातील सर्व घटकांनी स्वेच्छेने पालन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती.

**१. ब्रह्मचर्य (विद्यार्थी), ( वयोमर्यादा २५ पर्यंत ) :-**

ब्रह्मचर्य(विद्यार्थ्याचे जीवन) हे पदवीधर विद्यार्थ्यांच्या जीवनातील टप्प्याचे प्रतिनिधित्व करत असे. हा टप्पा शिक्षणावर केंद्रित होता आणि त्यात ब्रह्मचर्य पालनाचा समावेश आहे .

विद्यार्थी गुरुकुलात ( गुरूंचे कुटुंब/कुळ) जात असे आणि सामान्यतः गुरू सोबत राहायचे, विज्ञान,तत्वज्ञान,शास्त्रआणि तर्कशास्त्राचे ज्ञान मिळवायचे, आत्म-शिस्तीचा सराव करायचा, गुरुसाठी दक्षिणा मिळवण्यासाठी काम करायचे, धार्मिकता, नैतिकता, कर्तव्ये जीवन जगायला शिकायचे .

व्यक्तीच्या जीवनातील पहिला व अतिशय महत्त्वाचा आश्रम म्हणजे ब्रह्मचर्य आश्रम होय. वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत या आश्रमाचा कालखंड मानलेला होता. उपनयन संस्कार केल्यानंतर या आश्रमाची सुरुवात होत असे. उपनयन संस्कार करताना विद्यार्थ्याला भावी काळातील जीवनाविषयी माहिती दिली जात असे. पुढील १२वर्षाच्या काळात त्याने गुरुगृही राहून नियमांचे पालन करून शिक्षण घ्यावे असे मानले होते. या काळात त्याने विविध विषयांचे ज्ञान मिळवावे, चांगल्या विषयाचे संपादन करावे अशी अपेक्षा होती. गुरुकुलामध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला पुढील आश्रमात जाण्याची परवानगी दिली जात असे.

**२. गृहस्थ (गृहस्थ)( वयोमर्यादा २५ ते ५० ) :-**

हा टप्पा व्यक्तीच्या विवाहित जीवनाचा संदर्भ देतो, ज्यामध्ये घर सांभाळणे, कुटुंबाचे संगोपन करणे, मुलांना शिक्षण देणे आणि कुटुंबकेंद्रित आणि धार्मिक सामाजिक जीवन जगणे ही कर्तव्ये असतात. गृहस्थ टप्पा हा समाजशास्त्रीय संदर्भात सर्व टप्प्यांपैकी सर्वात महत्वाचा मानलाजात असे, कारण या टप्प्यात मानवांनी केवळ सद्गुणी जीवन जगले नाही तर त्यांनी अन्न आणि संपत्ती निर्माण केली ज्यामुळे जीवनाच्या इतर टप्प्यांमध्ये लोकांना आधार मिळाला, तसेच मानवजातीला पुढे नेणारी संतती देखील निर्माण झाली. हा टप्पा असा देखील होता जिथे मानवाच्या जीवनात सर्वात तीव्र शारीरिक, लैंगिक, भावनिक, व्यावसायिक, सामाजिक आणि भौतिक आसक्ती अस्तित्वात असतात.गृहस्थाश्रमाचा कालखंड २५ ते ५० वर्षे असा मानलेला होता गृहस्थ व्यक्तीने पुरुषार्थांची प्राप्ती करून घ्यावी तसेच पंच ऋणातून मुक्तता मिळवावी; हे गृहस्थ व्यक्तीसाठी आवश्यक मानलेले होते.

**३. वानप्रस्थ (वनात फिरणारा/वनवासी)( वयोमर्यादा ५० ते ७५ ) :-**

निवृत्तीचा टप्पा, जिथे एखादी व्यक्ती घरातील जबाबदाऱ्या पुढच्या पिढीकडे सोपवत असे, सल्लागाराची भूमिका घेत असे आणि हळूहळू जगातून दूर जात असे. वानप्रस्थ टप्पा हा गृहस्थांच्या जीवनातून अर्थ आणि काम (संपत्ती, सुरक्षा, सुख आणि इच्छा) वर जास्त भर देऊन मोक्ष (आध्यात्मिक मुक्ती) वर जास्त भर देऊन संक्रमणाचा टप्पा होता.

गृहस्थाश्रमातील सर्व सुखांचा उपभोग तसेच संन्यास आश्रमातील सर्व सुखांचा त्याग या दोन परस्पर भिन्न असलेल्या अवस्थांच्या मधील वानप्रस्थाश्रम ही एक अवस्था आहे. व्यक्तीला सुखांचा उपभोग घेण्यापासून अलिप्त करण्याचे तसेच त्याच्यामध्ये त्यागाची प्रवृत्ती निर्माण करण्याचे कार्य या आश्रमात केले जात असे. सामान्यतः वयाच्या ५० वर्षानंतर कौटुंबिक व आर्थिक जबाबदारीतून व्यक्तीने स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न या काळात करावा. त्यासाठी त्यांनी आपल्या पत्नीसह अरण्यात जाऊन रहावे असे मानले होते. काही दिवस कुटुंबात राहून कौटुंबिक समस्यांच्या बाबतीत व कौटुंबिक परंपरांच्या बाबतीत नवीन पिढीला मार्गदर्शन करावे ही अपेक्षा होती. या काळात व्यक्तीला काही कर्तव्य पार पाडण्यास सांगितली आहेत. वानप्रस्थाश्रमात व्यक्तीने दैनंदिन जीवनात यज्ञाचा अवलंब करावा ,सामाजिक जीवनातून संन्यस्थ प्रवृत्तीचा विकास करावा ,सुखांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा, निश्चयपूर्वक व निर्धाराने प्रयत्न केल्याशिवाय कुटुंब व समाज याविषयी असणारी आसक्ती नष्ट होऊ शकत नाही. वानप्रस्थाश्रमाच्या २५ वर्षांच्या काळात मोक्ष अवस्था प्राप्त करून घ्यावी.

**४. संन्यास (संन्यास)( वयोमर्यादा ७५+ ) :-**

या टप्प्याचे वैशिष्ट्य म्हणजे भौतिक इच्छा आणि पूर्वग्रहांचा त्याग, भौतिक जीवनापासून उदासीनता आणि अलिप्ततेची स्थिती, सामान्यतः कोणतीही अर्थपूर्ण मालमत्ता किंवा घर नसलेली (तपस्वी) आणि मोक्ष , शांती आणि साध्या आध्यात्मिक जीवनावर लक्ष केंद्रित करणे. जीवनाचा ब्रह्मचर्य टप्पा पूर्ण केल्यानंतर कोणीही या टप्प्यात प्रवेश करू शकतो .

आश्रम संस्थेतील अतिशय कठीण जीवनाचा आश्रम म्हणजे संन्यास आश्रम होय. वानप्रस्थाश्रमात सुखांची आसक्ती नष्ट करण्याचे व त्यागाची प्रवृत्ती विकसित करण्याचे काम वानप्रस्थाश्रमात होत असे. त्यामुळे संन्यास आश्रमात प्रवेश करताना व्यक्ती कोणत्याही सुखाच्या इच्छेपासून पूर्णतः विरक्त झालेला असे. संन्यास आश्रमात त्याने जंगलामध्ये वास्तव्य करावे. तसेच दैनंदिन जीवनातील नित्य यज्ञ, व्रत वैकल्य, देव देवतांची प्रार्थना यामध्येच जास्तीत जास्त काळ व्यतीत करण्याचा प्रयत्न करावा. लोकांकडून मिळणाऱ्या अन्नदानावर तसेच जंगलातील फळे, कंदमुळे यावरच आपला उदरनिर्वाह करावा. गृहस्थाश्रमात असताना त्याने धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची प्राप्त प्राप्ती तसेच पंच ऋणातून मुक्तता मिळवल्याने चौथा पुरुषार्थ म्हणजेच मोक्षप्राप्तीसाठी व्यक्ती संन्यास आश्रमाच्या काळात प्रयत्न करीत असे.

पुढील काळात समाज जीवनात संन्यास आश्रमातील या कठीण व कठोर जीवनामुळेच संन्यास आश्रमाचे पालन करण्यास लोकांची तयारी राहिली नाही असे दिसते.

**प्राचीन भारतीय समाजात आश्रमाचे महत्त्व -**

प्राचीन भारतात कार्यरत असलेल्या सर्व सामाजिक संस्थांमध्ये आश्रम संस्थेला विशेष महत्त्व होते. व्यक्ती विकासाबरोबरच समाजाचाही विकास घडवण्याच्या उद्देशाने प्राचीन भारतात सामाजिक जीवनात आश्रम संस्थेला महत्त्वपूर्ण स्थान होते. व्यक्तीच्या वाढत्या वयाबरोबरच त्याला त्याच्या कर्तव्याची व जबाबदारीची जाणीव करून देणे तसेच समाजासाठी आवश्यक असलेल्या गुणांचा विकास होईल याकडे लक्ष देण्याचे काम आश्रम संस्थेने केले. आश्रम संस्थेच्या या वैशिष्ट्यांमुळेच पुढील काळात वर्णव्यवस्थेत ज्याप्रमाणे दोष निर्माण झाले तसे दोष आश्रम संस्थेत झालेले दिसत नाहीत. जोपर्यंत या आश्रम संस्थेच्या नैतिक नियमांचे समाजामध्ये योग्य पद्धतीने पालन होत होते तोपर्यंत आश्रम संस्था व्यक्ती व समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्तच ठरलेली दिसते.

**भारतीय समाज व्यवस्थेतील पंचऋण संकल्पना :–**

भारतीय समाज व्यवस्थेतील पंच ऋण संकल्पना म्हणजे जन्मानंतर व्यक्तीवर असलेले पाच प्रकारचे कर्ज किंवा ऋण आहेत, जे व्यक्तीला आयुष्यभर फेडावे लागतात. हे पाच ऋण म्हणजे माता, पिता, गुरु, देव आणि भूत (किंवा धरती) यांचे ऋण आहेत. ही संकल्पना व्यक्तीच्या समाजाप्रती आणि इतरांप्रती असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये दर्शवते.

पंच ऋण

१. मातृ पितृ ऋण
२. गुरु ऋण
३ . देव ऋण
४. समाज ऋण
५. पशूपक्षी ऋण

ऋग्वेदकाळापेक्षा उत्तर वेदकाळातील सामाजिक जीवनात महत्त्वाचे बदल झाले राज्य व्यवस्था निर्माण झाल्यामुळे शहरीकरण वाढले समाजाच्या सुख सोयी वाढल्या सामाजिक जीवनातही विविध परंपरा व संस्थांना महत्त्व मिळत गेले असे दिसते प्राचीन भारतीय विचारवंतांनी समाजासमोर काही आदर्श व्यवस्था व संकल्पना निर्माण केल्या या आदर्श संकल्पनांचे समाजाने काटेकोर पालन करावे असे अपेक्षित होते प्राचीन भारतीय विचारवंतांनी सामाजिक जीवनात मोक्ष प्राप्ती मिळविणे हे मानवाचे अंतिम ध्येय मानलेले होते त्यासाठीच विविध आदर्श संकल्पना समाजासमोर मांडण्यात आल्या त्यापैकीच पंच ऋण संकल्पना ही महत्त्वाची मानलेली होती. पंचऋण संकल्पना प्राचीन भारतामध्ये सामाजिक जीवनात गृहस्थाश्रमातील व्यक्तीला पंच ऋणातून मुक्त होणे महत्त्वाचे मानलेले होते मानवाला आपल्या जीवनात पाच स्वरूपाचे ऋण म्हणजेच कर्ज असतात

**१. मातृ पितृ ऋण :-**आपल्याला माता पित्याने जन्म दिला, आपले संगोपन केले हे माता पित्याचे ऋण मानलेले होते. मानवाने त्यांची सेवा करून त्यांच्या ऋणातून मुक्ती मिळवावी असे मानलेले होते.

**२. गुरु ऋण :-**माता आणि पिता यांनी दिलेल्या अनौपचारिक शिक्षणानंतर अवपचारिक औपचारिक शिक्षणाद्वारे आपला पुनर्जन्म घडवण्याचे कार्य व ज्ञानाच्या माध्यमातून जीवनात सर्वांगीण विकास करण्याची संधी उपलब्ध करण्याचे काम गुरु करतात त्यामुळे हे गुरुचे ऋण मानलेले होते.

**३. देव ऋण :-** परमेश्वराने सजीव प्राण्यांमध्ये आपल्याला मानवाचा जन्म दिला व मोक्षप्राप्ती करून घेण्याची संधी दिली हे प्रत्येक मानवावर परमेश्वराचे ऋण मानलेले होते परमेश्वराचे स्मरण ठेवणे म्हणजेच त्याच्या ऋणातून मुक्ती मिळविणे होय असे मानलेले होते.

**४. समाज ऋण :-**ज्या समाजाने एक घटक म्हणून आपल्याला समाविष्ट करून घेतले तसेच आपली सर्वांगीण प्रगती होण्यासाठी आवश्यक ते वातावरण निर्माण केले हे समाजाचे ऋण मानलेले होते

**५. पशुपक्षी ऋण :-**मानवाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जीवन जगण्यास मदत करणाऱ्या पशुपक्ष्यांचेही ऋण मानलेले होते अशा प्रकारे प्राचीन भारतीय समाजात पंच ऋणांना अनन्य साधारण महत्व होते.

**भारतीय समाजातील चार पुरुषार्थ :–**

प्राचीन भारतीयांनी समाज जीवनाची उद्दिष्टे व ध्येय स्पष्ट करताना पुरुषार्थ संकल्पनेला प्राधान्य दिले होते अध्यात्मिकता हा भारतीय संस्कृतीचा पाया असला तरी विचारवंतांनी लौकिक जीवनाचाही विशेष दृष्टीने विचार केला होता.उत्तर वेदकाळात मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट मोक्ष प्राप्ती करणे हे मानलेले होते प्रत्येक व्यक्तीने मोक्ष प्राप्तीसाठी कोणत्या आचार नियमांचे काटेकोर पालन करावे याची मी मांसा व मार्गदर्शन भारतीय संस्कृतीने प्राधान्याने केलेले दिसते व्यक्तीने आपल्या जीवनात यश कसे मिळवावे मोक्ष प्राप्ती कशी साध्य करावी याविषयी सामाजिक संस्थांनी काही आदर्श मांडले होते या आदर्शाचे प्राचीन भारतीय समाजात काटेकोर पालन केले जात असे व्यक्तीच्या जीवनात चार पुरुषार्थ सांगण्यात आले होते.

पुरुषार्थ संकल्पना-प्राचीन भारतात व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने पुरुषार्थ संकल्पना आदर्श मानली गेली होती. सामाजिक संस्था किंवा विचार प्रणाली म्हणजेच पुरुषार्थ होय. व्यक्तिने आपल्या जीवनात कोणते नियम पाळावेत, कोणती सुखी उपभोगावीत तसेच कोणती कर्तव्य पार पाडावीत याचे विश्लेषण पुरुषार्थ संकल्पनेत केलेले आहे. पुरुष म्हणजे व्यक्ती आणि अर्थ म्हणजे ज्या गोष्टीची इच्छा केली जाते अशी वस्तू. यावरून व्यक्ती ज्या गोष्टीची इच्छा करते ती साध्य करणे म्हणजे पुरुषार्थ होय. तसेच ज्याद्वारे ते उद्दिष्ट साध्य केले जाते त्यालाही पुरुषार्थ असे म्हणतात. प्राचीन भारतीय समाज जीवनात धर्म, अर्थ , काम व मोक्ष या चार पुरुषार्थांना विशेष महत्त्व दिलेले होते.

**धर्म :-**

पुरुषार्थ संकल्पनेत सर्वात महत्त्वाचा पुरुषार्थ म्हणून धर्म या संकल्पनेला महत्त्व दिलेले होते. धर्म या तत्त्वांमध्ये इतर तीन पुरुषार्थांचा समावेश होतो असे मानले जाते. धर्म या संकल्पनेत कोणत्याही आचाराचा किंवा विधींचा समावेश नव्हता. केवळ नैतिक बंधने यामध्ये सांगितलेली होती. धर्म हा शब्द ध्रु या संस्कृत मूळ शब्दापासून बनला आहे. ध्रु म्हणजे समाजाचे नियमन किंवा नियंत्रण करणारे आचार किंवा नैतिक बंधने असे मानलेले होते. ऋग्वेद काळात यालाच ऋत अशी संज्ञा दिली होती. ऋत म्हणजे नैतिक नियमांचे पालन करणे. या तत्त्वाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला वरूण देवता शिक्षा देते असे मानलेले होते. महाभारतातही धर्म या संकल्पनेचे स्पष्टीकरण करताना नैतिक आचार विषयी नियमांना प्राधान्य दिले होते. धर्म या संकल्पनेत लौकिक जीवनातील उत्कर्षा बरोबरच पारलौकिक जीवनातील उत्कर्षाविषयीचे विचार व नियम यांचा समावेश होतो. याशिवाय स्मृती ग्रंथ व कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथांमध्येही धर्म या पुरुषार्थाचे विश्लेषण केलेले आहे. धर्म ही संकल्पना म्हणूनच भारतीय समाजामध्ये विशेष महत्त्वाची मानली जाते.

**अर्थ:-**

प्राचीन भारतीय समाजाचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अर्थ या संकल्पनेलाही धर्म या पुरुषार्थासोबत स्थान दिले होते. कौटिल्यांनी आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने अर्थ हा पुरुषार्थ अधिक महत्त्वाचा मानला आहे. मानवाच्या उपजीविकेची व चरितार्थासाठी लागणारी साधने म्हणजे अर्थ होय; असे मानलेले आहे. व्यक्तीला आपले जीवन सुखी करण्यासाठी पैशाची गरज असते. तसेच उपजीविकेचे साधन निर्माण करणे हेही आवश्यक मानलेले होते. अर्थ या पुरुषार्थाची प्राप्ती करताना व्यक्तीने धर्म बंधनाची जाणीव ठेवणे आवश्यक मानलेले होते. केवळ पैसा मिळविणे, अयोग्य आणि लाचार मार्गाने पैसा मिळवून आपली उपजीविका करणे याला मान्यता दिलेली नव्हती. अर्थ प्राप्ती करून घेण्यामध्येच गुंतल्यास कोणतीही व्यक्ती मोक्ष प्राप्तीकडे वाटचाल करू शकत नाही असे मानलेले होते.

**काम:-**

भारतीय संस्कृतीमध्ये काम या पुरुषार्थ संकल्पनेला धर्म व मोक्ष या संकल्पनेबरोबरचे स्थान दिलेले आहे. या पुरुषार्थाची प्राप्ती केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला मोक्षप्राप्तीकडे वाटचाल करता येत नाही. काम म्हणजे इच्छा विशिष्ट अर्थाने ऐहीक सुखाची इच्छा करणे म्हणजे काम असे मानलेले होते. वात्स्यायनाने लिहिलेल्या कामशास्त्र या ग्रंथात काम या संकल्पनेचे स्पष्टीकरण केलेले आहे. भारतीय विचारवंतांच्या मते काम पुरुषार्थ संपादन करताना व्यक्तीने नैतिक नियमांचे व बंधनांचे पालन करणे आवश्यक आहे. कारण कामवासनेच्या पूर्ततेसाठी व्यक्ती गुंतून राहिल्यास तो मोक्षप्राप्तीकडे वाटचाल करू शकत नाही.

**मोक्ष:-**

उत्तर वेद काळानंतर मोक्ष मिळविणे हेच मानवाचे अंतिम ध्येय मांनण्यात आले. जन्म मृत्यूच्या चक्रातून सुटका करून घेणे म्हणजे मोक्ष होय. गेल्या जन्मातील कर्म बंधनानुसार या जन्मामध्ये सुखदुःख भोगणे भाग पडते. मात्र व्यक्तिने

या जन्मात नैतिक तत्त्वांचे काटेकोर पालन केल्यास तसेच शुद्ध आचार विचार ठेवल्यास कोणतीही नवीन कर्म बंधने निर्माण होत नाहीत असे मानले होते. गेल्या जन्मातील कर्म बंधनातून मुक्त झालेला आत्मा नवीन कर्म बंधने निर्माण न झाल्याने परिपूर्ण अवस्था म्हणजेच मोक्षप्राप्ती करू शकतो. मोक्ष प्राप्ती हेच मानवाचे अंतिम ध्येय मानलेले होते. त्यासाठी चार पुरुषार्थांची प्राप्ती करणे आवश्यक मानले होते.

**स्त्रिया व पुरुषार्थ संकल्पना:-**

प्राचीन भारतीय समाजात पुरुषार्थांची प्राप्ती करून घेणे हे स्त्रियांच्या दृष्टीने ही आवश्यक मानलेले होते. विशेषतः पुरुषार्थाची प्राप्ती करून घेणे हे स्त्रियांचे कर्तव्य मानले होते. उत्तर वेदकाळात विवाह विधी मध्ये कन्यादान करताना वधू पिता आपल्या जावयाला धर्म, अर्थ, काम यांची प्राप्ती करून घेताना आपल्या मुलीची अवहेलना करू नये असे सांगत असे. यावरून स्त्रिया सुद्धा मोक्ष प्राप्ती साठी प्रयत्न करीत होत्या असे दिसते.

**पुरुषार्थ संकल्पनेचे महत्त्व:-**

प्राचीन भारतातील सामाजिक संस्थांमध्ये पुरुषार्थ या संकल्पनेला विशेष महत्त्वाचे स्थान होते. व्यक्तीच्या जीवनाचा तसेच सामाजिक जीवनाचाही विचार यामध्ये करण्यात आलेला होता. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असलेल्या मोक्ष प्राप्तीसाठी पुरुषार्थाची प्राप्ती करून घेणे आवश्यक मानलेले होते. मानवाच्या या जन्माबरोबरच मृत्यूनंतरच्या अवस्थेचाही विचार या संकल्पनेत करण्यात आला होता. भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यामध्ये पुरुषार्थ संकल्पनेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. म्हणूनच व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने पुरुषार्थ संकल्पनेला प्राचीन भारतीय समाजामध्ये विशेष महत्त्व दिलेले होते.

**सारांश :-**

प्राचीन भारतात व्यक्ती व समाजाच्या प्रगतीला सहाय्य करणाऱ्या ज्या सामाजिक संस्थांची निर्मिती झाली प्राचीन भारतीय विचारवंतांनी सामाजिक जीवनात मोक्ष प्राप्ती मिळविणे हे मानवाचे अंतिम ध्येय मानलेले होते त्यासाठीच विविध आदर्श संकल्पना समाजासमोर मांडण्यात आल्या त्यापैकीच पंच ऋण संकल्पना ही महत्त्वाची मानलेली होती. त्यातील आश्रम व्यवस्था ही एक प्रमुख सामाजिक संस्था होती.व्यक्ती विकासाबरोबरच समाजाचाही विकास घडवण्याच्या उद्देशाने प्राचीन भारतात सामाजिक जीवनात आश्रम संस्थेला महत्त्वपूर्ण स्थान होते. प्राचीन भारतीयांनी समाज जीवनाची उद्दिष्टे व ध्येय स्पष्ट करताना पुरुषार्थ संकल्पनेला प्राधान्य दिले होते अध्यात्मिकता हा भारतीय संस्कृतीचा पाया असला तरी विचारवंतांनी लौकिक जीवनाचाही विशेष दृष्टीने विचार केला होता.

**संदर्भ सूची :-**

१. समाजशास्त्र - डॉ. शैलजा माने - निराली प्रकाशन पुणे
२. भारतीय समाजशास्त्र परंमपरा - मुंबई विद्यापीठ बी. ए. भाग २
२. भारतीय समाज संरचना आणि समस्या - डॉ. प्रदीप आगलावे - श्री साइनाथ प्रकाशन
४. Development as freedom : Dr. Amartya Sen
५. https://www.wisdomlib.org/concept/indian-social-system
६. https://vajiramandravi.com/upsc-exam/salient-features-of-indian-society/
७. Incredible Heritage -
८. Ancient India